# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

## (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखा)

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्रं.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

---

**विषय -** कोरोना विषाणू (कोव्हीड19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.

**वाचावे -** 1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005

2. साथ रोग अधिनियम, 1897

3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. कोरोना/ 2020/ प्र.क्र. 58/ आरोग्य 5, दि.14/03/2020

4 जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडील आदेश क्र. डी.सी./कार्या 9 ब 1/465/2021, दि. 22/02/2021.

5. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. डीएमयु/2020/सी.आर.92-डीआयएसएम - 1, दि. 24/02/2021.

6. जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडील आदेश क्र. डी.सी./कार्या 9 ब 1/686/2021, दि. 16/03/2021

| क्र.आव्यमपु/कार्या 19अ/283/2021 | **आदेश** | अहमदनगर दिनांक- 26 /03/2021 |
|---|---|---|

ज्याअर्थी, साथरोग अधिनियम 1897 कलम 2 (1) नुसार जिल्हाधिकारी अहमदनगर यांना अहमदनगर जिल्हा कार्यक्षेत्रात कोवीड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 6 चे आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात निर्बंध शिथील व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उघडणे (मिशन बिगीन अगेन) संदर्भातील मार्गदर्शक सूचनांची दि.31/03/2021 पर्यत अंमलबजावणी करणेबाबत आदेशीत केलेले आहे. संदर्भ क्र. 7 अन्वये अहमदनगर जिल्हयात कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखणेकामी प्रतिबंधात्मक आदेश लागू करणेत आलेले आहेत.

ज्याअर्थी, अहमदनगर जिल्हयात कोरोना संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होऊ न देणेकामी नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी अहमदनगर जिल्हयातील सर्व आठवडे बाजार बंद करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर साथरोग अधिनियम 1897 व आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अहमदनगर जिल्हयात कोरोना विषाणू (कोविड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खबरदारीच्या उपाययोजना म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी

Scanned with CamScanner

**अहमदनगर जिल्हयातील सर्व आठवडे बाजार दिनांक 29/03/2021 पासून दिनांक 15/04/2021 पर्यंत बंद ठेवणेबाबत या आदेशाव्दारे आदेशित करीत आहे.**

कोणतीही व्यक्ती/संस्था/संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास ते साथरोग अधिनियम 1897 मधील तरतूदीनूसार भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

जिल्हाधिकारी अहमदनगर
सत्यमेव जयते
अहमदनगर

**स्वाक्षरी /--**
**(डॉ. राजेन्द्र ब. भोसले)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**अहमदनगर**

प्रति.

1) पोलीस अधिक्षक, अहमदनगर
2) मुख्य कार्यकारी अधिकारी, छावणी मंडळ, अहमदनगर
3) आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर
4) जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांचेकडेस माहिती व प्रसिध्दीसाठी.
5) उपविभागीय अधिकारी (सर्व), जि. अहमदनगर
6) तहसिलदार तथा घटना व्यवस्थापक (सर्व), जि. अहमदनगर
7) मुख्याधिकारी नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व), जि. अहमदनगर

**(संदीप निचित)**
**निवासी उपजिल्हाधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**अहमदनगर**

Scanned with CamScanner